# इतनी खामोशी क्यु है

## नगर पालिका निवडणुकीकरीता सोमवारपासून अर्ज भरायला सुरूवात झाली

# तरी सुध्दा सगळे सामसूम...सन्नाटा...




Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

**बीड, (दिव्य न्युज):- ज्या नगर पालिका निवडणुकीची वाट मागील तीन वर्षापासून हौशे नौसे गौशे हे पाहत होते तो निवडणूकीचा सण निवडणूक आयोगाने घोषीत केला. सोमवारपासून अर्ज भरायला सुरूवात झाली आज बुधवार. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार नगरसेवक पदासाठी एकूण ५१ ऑनलाईन अर्ज अन् १ ऑफलाईन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी नगर परिषद बीड यांना प्राप्त झाले आहेत. ज्या निवडणुकीची वाट तीन वर्षापासून भावी नगरसेवक पाहत होते. पण निवडणूकीला सुरूवात झाली अन् शहरात सामसुम संन्नाटा दिसुन येत आहे. कुठेही उत्साहाचे वातावरण दिसुन येत नाही. कोणत्या पक्षाकडून आत्तापर्यंत अधिकृत रित्या नगरसेवकांसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची घोषणा करण्यात आलेली नाही.**

इच्छुकांची सर्वात जास्त गर्दी ही सत्ताधारी राष्ट्रवादी आणि विरोधी राष्ट्रवादीकडेच दिसून येत आहे. ज्या राज्याचा मुख्यमंत्री भाजप पक्षाचा आहे त्या पक्षाचे कार्यालय मात्र सामसुम दिसून येत आहे. ना जिल्हाध्यक्ष बीडमध्ये, ना तालुकाध्यक्ष, ना शहराध्यक्ष बीडमध्ये दिसुन येत नाही. कोणीही मी भाजपाकडून इच्छुक आहे असेही म्हणणारे एकही इच्छुक आजपर्यंत दिसुन आलेला नाही. तशीची काहीशी अवस्था दुसऱ्या सत्ताधारी पक्षाची म्हणजे शिंदे सेनेची आहे. दोन्ही जिल्हाप्रमुखाचे कार्यालय हे विराण झाल्याचे चित्र सध्या दिसुन येत आहे. फक्त दोन्ही पक्षाच्या जिल्हाध्यक्षांची पत्रकेकाढुन इच्छुकांकडून इच्छुक अर्ज मागविले आहेत. त्याच्या पलिकडे दुसरी कोणतीच हलचाल या सत्ताधारी पक्षाकडून दिसून येत नाही. काँग्रेसचीही अवस्था तशीच आहे. गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत एकेकाळी काँग्रेसचा बोलबाला होता. आज या पक्षाकडून कोणीही इच्छुक नसल्याचे चित्र जिल्हाभरात दिसून येत आहे. ज्या निवडणुकीकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या होत्या त्या नगर पालिकेसाठी निवडणूक लागली पण उत्साह मात्र शुन्यच दिसून येत आहे. यापुर्वी जेव्हा नगर पालिकेची निवडणूक लागायची तेव्हा महिनाभरापुर्वीच इच्छुक उमेदवाराची गजबज असायची... वृत्तपत्रात मुलाखती छापून यायचा, मोठ मोठे लेख छापून यायचे विद्यमान नगरसेवकांचा पाच वर्षाचा लेखा जोखा प्रसिध्द व्हायचा की आम्ही पाच वर्षात किती दिवे विकासाचे लावले पण आता होत असलेल्या निवडणूकीत असे काहीच दिसून येत नाही. पुर्वी निवडणूक विभागाचे कार्यालय हे तहसिल कार्यालयात असायचे त्या ठिकाणी इच्छुकांतची तोंबा गर्दी उमेदवारी अर्ज भरतांना दिसुन यायची... कधी कधी तर पोलिसांना सोम्य पध्दतीचा लाठीचार्ज ही करावा लागायचा. पण आता निवडणुक विभाग हे नगर पालिकेतच सुरू करण्यात आलेला असुन उपविभागीय अधिकारी हे निर्वाचन अधिकारी आहेत. सोमवारपासून नगर पालिका कार्यालयात इच्छुकांची जेमथेम गर्दीच दिसून येत आहे. उमेदवारी अर्ज हा ऑनलाईन करावयाचा असल्याचा असल्याने कोणत्याही ऑनलाईन दुकानावर इच्छुकांची गर्दी दिसून येत नाही. ज्या नगर पालिका निवडणुकीची वाट मागील तीन वर्षापासून पाहत होते त्या नगर पालिका निवडणुकीत इतनी खामोशी क्यु है... असंच या बद्दल म्हणावे लागेल.



बीड :- तांदूळ घेऊन जाणारा ट्रक सोलापूर-धुळे महामार्गावर मंजरी फाटा येथे पलटी झाल्याची घटना आज सकाळी घडली आहे. या अपघातात सुदैवाने जीवितहानी टळली, पण ट्रकचे मोठे नुकसान झाले. तर रस्त्यातच ट्रक पलटी झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. परंतु पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघात ग्रस्त वाहन व पसरलेले साहित्य हटवून वाहतूक सुरळीत केली.

# मनोज जरांगेंच्या हत्येचा कट, बीडमधून तिसऱ्या आरोपीला ठोकल्या बेड्या

जालना ,(दिव्य न्युज):- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याच्या आरोपातून काही दिवसांपूर्वी दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. संबंधित दोघांनी सुपारी घेऊन जरांगे यांच्या हत्येचा कट रचल्याचा त्यांच्यावर आरोप होता. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन खळबळ उडवून दिली होती. त्यांनी अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले होते.

धनंजय मुंडे यांनी आपल्या हत्येचा कट रचला त्यांनी अडीच कोटींची सुपारी दिल्याचा आरोप जरांगे यांनी केला होता. एका बड्या राजकीय नेत्यावर अशाप्रकारे जरांगे यांनी आरोप केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी पोलिसांनी आधीच अमोल खुणे आणि दादा गरुड नावाच्या दोन आरोपींना अटक केली होती. या प्रकरणात आता तिसरी अटक करण्यात आली आहे.

मनोज जरांगे यांच्या हत्येचा कट रचल्या प्रकरणी तिसरा आरोपी कांचन साळवीला अटक केली आहे. त्याला बीडमधून बेड्या ठोकल्या आहेत. दादा गरुड आणि अमोल खुणे


▸▸ पान २ वर



# उद्धव ठाकरे-शरद पवारांना सुप्रीम कोर्टाचा धक्का

## स्थानिक निवडणुकीत धनुष्यबाण अन् घड्याळ वापरण्याचे इरादे धुळीस

मुंबई , (दिव्य न्युज):- सुप्रीम कोर्टात या प्रकरणी बुधवारी सुनावणी पार पडली. यावेळी सुप्रीम कोर्टाने दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेतले. त्यानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्यानंतर या प्रकरणी २१ जानेवारीला सकाळी ११.३० वाजता होणार आहे. यावेळी सुप्रीम कोर्टात पहिल्यांदा शिवसेनेच्या पक्ष चिन्हाबाबत युक्तिवाद होईल तर त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष



चिन्हाबाबत युक्तिवाद होणार आहे.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचे यावर गेल्या तीन वर्षांपासून सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. सर्व राज्याचे लक्ष या खटल्याच्या निकालाकडे लागले आहे. मात्र नेहमीच या प्रकरणाला नवीन तारीख मिळत असते. बुधवारी

▸▸ पान २ वर

# राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी संपली, कोर्टात नेमकं काय घडलं?

मुंबई , (दिव्य न्युज):- अजित पवार यांनी दोन वर्षांपूर्वी राष्ट्रवादीचे बहुतांशी आमदार सोबत घेत शरद पवारांची साथ सोडली होती. अजित पवार हे शिंदे फडणवीस सरकारमध्ये सामील झाले होते. त्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले, पक्षाच्या नावावर आणि चिन्हावर दोन्ही पक्षांनी दावा केला होता. काही काळानंतर कोर्टाने नाव आणि पक्षचिन्ह अजित पवारांच्या गटाला दिले होते. मात्र आमदार अपात्रतेचे प्रकरण अजूनही कोर्टात आहे. आज या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली. यात नेमकं काय घटलं ते जाणून घेऊयात.

आज दुपारी सुनावणीला सुरुवात झाली. सुनावणीच्या सुरुवातील शरद पवारांचे वकील कपिल सिब्बल यांनी मला सुनावणीसाठी २ तास लागतील अशी माहिती दिली. यावर कोर्टाने तुम्ही सुरुवातीला कोणत्या प्रकरणाचा युक्तिवाद करणार आहेत अशी विचारणा केली. त्यानंतर वकिलांनी जानेवारीच्या दुसऱ्या आठड्यात सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यानंतर आता २१ जानेवारीला या प्रकरणाची सुनावणी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाची आता २१ जानेवारीला सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडणार आहे. त्यावेळी अजिप पवारांचे वकील पक्षातून बाहेप पडलेले आमदार अपात्र कसे नाहीत याबाबत युक्तीवाद करणार आहेत. तर शरद पवारांच्या वतीने पक्ष सोडताना या आमदारांनी नियमांचे उल्लंघन केले आणि त्यामुळे त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात यावी याबाबत मागणी करणार आहेत. या सुनावणीनंतर कोर्ट काय निर्णय देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. सर्वच पक्ष उमेदवारांची चाचपणी करत आहेत. शरद पवारांचा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जोरदार तयारी करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत विजय मिळवून आपली ताकद सिद्ध करण्याचा प्रयत्न या दोन्ही पक्षांचा आहे. शरद पवारांचा पक्ष महाविकास आघाडीसोबत निवडणूक लढवणार आहे, तर अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीत आपले नशीब आजमावणार आहे.

## बीड नगरपरिषद निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाला धक्का

# सभापती इलियास भाया एमआयएममध्ये प्रवेश

## ये तो ट्रेलर है..! पिक्चर अभी बाकी..!




बीड, (दिव्य न्युज):-बीड जिल्ह्यातील राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) माजी नगरसेवक तथा माजी सभापती इलियास भाया यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन

▸▸ पान २ वर



# 'स्कीम' मधून जादा परतावा तर सोडा

## बीडच्या विमा प्रतिनिधीने गुंतवलेले २१ लाख ही गेले

बीड , (दिव्य न्युज):- एका गुंतवणुकीच्या स्किममध्ये जादा परताव्याचे आमिष दाखवून बीड शहरातील एका विमा प्रतिनिधीची तब्बल २१ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अण्णासाहेब राठोड (रा. बंगाली पिंपळा, माळीवेस, बीड) असे फसवणूक झालेल्या विमा प्रतिनिधीचे नाव आहे. राठोड यांची ओळख कुणाल भाऊसाहेब चव्हाण (रा. चासनळी, जि. अहिल्यानगर; सध्या रा. पुणे) या व्यक्तीसोबत झाली होती. कुणाल चव्हाण याने अण्णासाहेब राठोड यांना एका विशिष्ट स्किममध्ये पैसे गुंतवल्यास जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. तसेच, विमानाचे तिकीट काढून देण्याचेही सांगितले. कुणालच्या बोलण्यावर विश्वास ठेवून राठोड यांनी २७ डिसेंबर २०२४ पासून त्याच्याकडे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. ४ जून २०२५ पर्यंत राठोड यांनी कुणालकडे एकूण २१ लाख ३० हजार रुपयांची गुंतवणूक केली होती. मात्र, नंतर कुणाल याने सांगितल्याप्रमाणे कोणताही परतावा दिला नाही आणि मुद्दल रक्कमही परत केली नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अण्णासाहेब राठोड यांनी बीड शहर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला असून, या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. अशा फसवणाऱ्या आमिषांपासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# दंड वसुली मोहीम



फरहान शेख

बीड : पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशाने बार्शी नाका येथे वाहनांची तपासणी करुन प्रलंबित दंड वसुली मोहीम राबविण्यात आली. यावेळी पेठ बीड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रीतम कुमार, वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, सोबत अंमलदार.

# मुख्यमंत्र्यांना चिठ्ठी लिहून शेतकऱ्याने जीवन संपवले



वडवणी, (दिव्य न्युज):- तालुक्यातील हरिश्चंद्र पिंप्री येथील २८ वर्षीय तरुण शेतकरी गोविंद रामराव शिंदे यांनी सोमवारी सकाळी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.गोविंदचे वडील रामराव शिंदे हे शेतकरी. दोन मुले आणि एक मुलगी असा संसार. मोठ्या मुला-मुलीचा विवाह झालेला असून गोविंद हा दुसरा मुलगा. नेहमीप्रमाणे रविवारी रात्री तो वडिलांसह शेतात झोपण्यासाठी गेला होता. सोमवारी सकाळी वडिलांना गावात सोडून पुन्हा शेताकडे गेला; परंतु काही तासांतच त्याचा मृतदेह सापडला.सततची नापिकी, शेतीमालाला न मिळणारा भाव, आणि दिवसेंदिवस वाढत जाणारा कर्जाचा बोजा या : सगळ्यांचा ताण असह्य झाल्याने गोविंदने अखेर जीवन संपविण्याचा टोकाचा निर्णय घेतला, अशी माहिती स्थानिकांकडून मिळाली. घटनास्थळी पोलिसांना मुख्यमंत्र्यांच्या नावे लिहिलेली चार ओळींची चिठ्ठी आढळली. त्यात त्याने शेतीमालाला भाव नाही, बँक कर्जाचा ताण असह्य झाला, त्यामुळे हा निर्णय घेत आहे असे लिहून आपली व्यथा मांडली आहे.पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून आकस्मित मृत्यूची नोंद घेऊन पुढील तपास सुरू आहे. गेल्या महिनाभरात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोविंदच्या शेतातील सोयाबीन आणि कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले होते. उत्पन्नाचा आध- ारच कोलमडल्याने तो मानसिक ताण- ाखाली होता, असे कुटुंबीय सांगतात. गोविंद शिंदेच्या मृत्यूने बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न पुन्हा एकदा अस्वस्थ करणारा ठरला आहे.

# दहशत! बिबट्याने महामार्गावर 'नाकाबंदी' केली

## बीडमधील आष्टी-नगर रस्त्यावर रात्री थरार

कडा , (दिव्य न्युज):- बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर रविवारी रात्री प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली. आष्टी तालुक्यातील भवानीनगर तांड्याजवळ एका बिबट्याने थेट रस्त्यावर ठाण मांडले आणि एका वाहनचालकाचा रस्ता अडवल्याचा थरारक व्हिडिओ समोर आला आहे. बिबट्यांनी आपला अधिवास बदलून आता चक्क रस्त्यावर येऊन बिनधास्तपणे संचार सुरू केल्याने डोंगरपट्ट्यातील नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे.

आष्टी तालुक्यातील विविध गावांच्या डोंगरपट्ट्यात गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्यांचे वास्तव्य आहे. वर्षानुवर्षे त्यांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. वनविभाग 'ठिकाण बदलून वास्तव्य' असल्याचे सांगत असले तरी, जनजागृती पलीकडे ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही दिवसांपूर्वी बावी येथील एका तरुण शेतकऱ्याचा बिबट्याने जीव घेतला होता. याशिवाय पाळीव श्वान, वासरं आणि शेळ्यांवरही हल्ले झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. आता तर थेट महामार्गावर वाहनांच्या समोर बिबट्या बिनधास्त फिरत असल्याने, रात्रीच्या वेळी प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे.

समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी वनविभागाच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. बिबट्याचा संचार असलेल्या परिसरात वनविभागाने त्वरित पिंजरे बसवावेत. एखाद्याचा जीव गेल्यानंतर पिंजरा बसवून उपयोग काय होईल? वनविभागाने लोकांचा जीव धोक्यात घालू नये, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

याबाबत आष्टीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे यांना विचारणा केली असता, त्यांनी शेतकऱ्यांनी वनविभागाच्या सूचनांचे पालन करावे आणि बिबट्या नजरेस पडल्यास घाबरून न जाता खबरदारी घ्यावी, असे सांगितले. तसेच, 'आमच्या पथकांकडून पेट्रोलिंग सुरू आहे,' असे स्पष्टीकरण दिले.





### पतीचे 'क्रूर' रूप! भांडणानंतर केलं दुसरे लग्न

# जाब विचारताच पहिल्या पत्नीवर वस्तऱ्याने वार

केज , (दिव्य न्युज):- येथील क्रांतीनगर भागात राहणाऱ्या पती-पत्नीमधील किरकोळ वाद विकोपाला गेल्याने धक्कादायक घटना घडली. पहिली पत्नी माहेरी राहत असताना भांडणानंतर पतीने अवघ्या चार महिन्यांत दुसरे लग्न केले. पहिल्या पत्नीने याचा जाब विचारताच, पतीने तिच्या कपाळावर धारदार वस्ताऱ्याने वार करून इतर तिघांच्या मदतीने तिला बेदम मारहाण केली. पहिल्या पत्नीच्या फिर्यादीवरून पतीसह चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

क्रांतीनगर येथील रहिवासी सतीश लांडगे आणि त्यांची पत्नी अंजना लांडगे यांच्यात चार महिन्यांपूर्वी किरकोळ भांडण झाले होते. त्यामुळे अंजना लांडगे या क्रांतीनगर येथील त्यांच्या मुलाच्या घरी राहत होत्या. याच काळात सतीश लांडगे यांनी दुसऱ्या महिलेशी लग्न करून तिच्यासोबत राजरोस राहण्यास सुरुवात केली. नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळताच अंजना लांडगे यांनी पतीकडे विचारणा केली. तसेच, सामान आणि घर बांधण्यासाठी दिलेले २ लाख रुपये परत मागितले असता, सतीश लांडगे यांनी त्यांना घराबाहेर हाकलून दिले. या घटनेनंतर अंजना लांडगे यांच्या फिर्यादीवरून पती सतीश लांडगे, अलका मुजमुले, किरण मुजमुले आणि कुणाल मुजमुले या चौघांविरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार त्रिंबक सोपने हे पुढील तपास करत आहेत. वस्तऱ्याने वार करून जीवे मारण्याची धमकी ७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता अंजना लांडगे यांचा मुलगा आणि सून ऊस तोडणीसाठी साखर कारखान्यावर गेले होते. अंजना लांडगे घरी एकट्या असल्याची संधी साधून पती सतीश लांडगे याच्यासह अलका रोहिदास मुजमुले, किरण रोहिदास मुजमुले आणि कुणाल रोहिदास मुजमुले हे चौघेजण त्यांच्या घरात घुसले. या चौघांनी अंजना लांडगे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. क्रूरतेची परिसीमा गाठत पती सतीश लांडगे याने अंजना लांडगे यांच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

# माजलगावात महिलेचे दीड तोळे सोने लुटले

माजलगाव, (दिव्य न्युज):- माजलगाव शहरात भरदिवसा घडलेल्या गुन्ह्याने एकच खळबळ उडाली आहे.अज्ञात इसमाने वृद्ध महिलेला नाकावर गुंगी आणणारा रुमाल दाबून दीड तोळे सोन्याचे दागिने लंपास केले.ही घटना बुधवार दि.१२ रोजी दुपारी शहरातील बीड रोडवर मुख्य रहदारीच्या ठिकाणी घडली.

याबाबत समजलेली माहिती अशी की,तोताबाई काळू राठोड ङ(वय ६५ वर्ष) राहणार नित्रुड तांडा.या आपल्या नातवाला कपडे घेण्यासाठी नित्रुड गावावरून माजलगावला आल्या होत्या.कपडे खरेदीसाठी त्या एका दुकानात जात असताना दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्याशी संवाद साधत असताना अचानक गुंगी आणणारा रुमाल

त्यांच्या नाकावर दाबला गेला.काही क्षणात महिला बेशुद्ध पडताच त्या व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने नाकातील नथ,सेवन पीस,तब्बल दीड तोळे सोने हिसकावून पोबारा केला.दरम्यान बेशुद्धावस्थेतून शुद्धीवर आल्यानंतर महिलेने ही माहिती नातेवाईकांना दिली. नातेवाईकासह पीडित महिलेने पोलीस स्टेशन गाठले असूनसदरील घटनेची माहिती पोलिसांना दिली आहे.माहिती मिळताच पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरेद्वारे घटनाक्रम समजून घेऊन तपासाची सूत्रे फिरवले आहेत.दरम्यान, शहरात या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

पान ४ वरून

## बीड आरटीओ

जी-फॉर्म म्हणजेच लाचखोरीचा कोडवर्ड !

आरटीओ कार्यालयात जी-फॉर्म दिला का? हेच आता काम होण्याचं तिकीट बनलं आहे. मोटारसायकलसाठी ३००, चारचाकीसाठी ८००, आणि ट्रकसाठी तब्बल १५०० रुपये एजंटमार्फत घेतले जातात. पैसे दिले तर काम आठवड्यात होतं; नाही दिलं तर फाईल गायब! एजंटांच्या नावांचे 'कोडवर्ड' कागदपत्रांवर लिहिले जातात ते पाहून अधिकारी काम करतात.

................

फिटनेसच्या नावाखाली लाचखोरीचा उत्सव

फिटनेस सर्टिफिकेटसाठी वाहनाची तपासणी करताना इंडिकेटर, हेडलाईट, ब्रेक, वायपर, रेडियम, हॅन्ड ब्रेक आदी किरकोळ बाबींवर आक्षेप घेऊन प्रत्येक त्रुटीवरएक हजार रुपये नाही दिले तर वाहन पास नाही असे सरळ सांगितले जाते.

................

'एजंटला पैसे द्या आणि काम झालं समजा' हा इथला नियमच बनला आहे

पैसे न दिल्यास अर्ज २-३ महिने प्रलंबित ठेवला जातो आणि सिस्टम बंद आहे, फाईल वर गेली आहे, कागदपत्र कमी आहेत, एक सर्टिफिकेट कमी आहे, वाहन ऑनलाईन नाही, स्पीड गव्हर्नर मशीन नाही असे खोटे कारण दिले जाते.

................

पिण्याचे पाणी नाही, सावली नाही; नागरिकांचा अपमान

फिटनेस चेकसाठी येणाऱ्या वाहनधारकांना तासन्तास उन्हात थांबावे लागते. ना पिण्याच्या पाण्याची सोय, ना बसण्याची व्यवस्था, ना प्रथमोपचार पेटी. शासनाच्या नावाखाली लाखोंचा महसूल गोळा करणारे हे कार्यालय नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करत आहेत.

## कागदपत्रांसाठी

उतरणमाची तमारी अनेकांनी केली आहे. त्मा अनुषंगाने आतापासूनच अनेकांनी मोर्चे बांधणी केली असल्माचे दिसून मेत आहे. बीड मेथील नगर पालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्माच्मा दुसऱ्मा दिवशी म्हणजेच मंगळवारी अनेकांनी गर्दी केल्माचे पहावमास मिळाले. तसेच अनेकजण आपल्मा अडचणी विचारण्मासाठी थेट निवडणूक निर्णम अधिकारी कविता मुख्माधिकारी शैलेश फडसे मांच्माशी संपर्क साधत असल्माचे दिसून आले. ऑनलाइन अर्ज असल्माने कागदपत्रे दाखल करण्मापूर्वी त्माची कर्मचाऱ्मांकडून

पाहणी केली जात आहे. ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल केल्मानंतर तो बीड मेथील नगर पालिकेत जमा करावा लागणार आहे. माबाबतच्मा सर्व सूचना मापूर्वीच संबंधिताना दिल्मा आहेत. जाधव व असे आहे वेळापत्रक उमेदवारी अर्ज दाखल करण्मासाठी १७ नोव्हेंबर २०२५ पर्मंत अखेरची मुदत आहे. १८ नोव्हेंबर रोजी अर्ज छाननी होईल. उमेदवारांना २१ नोव्हेंबरपर्मंत अर्ज मागे घेता मेणार आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारणे व छाननी प्रक्रिमा संबंधित नगर परिषद कार्मालमातच होणार आहे. नगराध्मक्ष आणि नगरसेवकासाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

**ही लागतील**

वैधता प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाची प्रत आदी कागदपत्रे जोडून उमेदवारांनी नामांकन भरावे लागणार आहे. ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करायचा असून मूळ प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा करावा लागणार आहे.

**राष्ट्रीमकृत**

खाते ग्राह्य धरले जाणार नाही. सदरील बँक खाते नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या कमीत कमी एक दिवस अगोदर उघडलेले असणे आवश्यक आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने

आरटीओ म्हणजे नियम नव्हे, रॅकेट चालवणारे लुटारूंचं अड्डं बनलं आहे. रोज लाखोंचा व्यवहार होतो, पण पावती कुणालाच मिळत नाही. आता या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर गंडांतर आणायची वेळ आली आहे ! बीड आरटीओ कार्यालयावर स्टिंग ऑपरेशन करून काळ्या पैशाचा उगम उघड करा अशी मागणी होऊ लागली आहे. खाजगी एजंटांना कार्यालयात प्रवेशबंदी लावा. दोषी अधिकारी व कर्मचारी यांना तत्काळ निलंबित करा. नागरिकांसाठी शुद्ध पाणी, निवारा व प्रथमोपचार सुविधा अनिवार्य करावी अशी मागणी वाहनधाकरकडून होत आहे. तसेच वाहन तपासणी, योग्यता प्रमाणपत्र च्या नावाखाली चाललेला काळाबाजार बंद करावा व जिल्हाधिकारी यांनी स्वतः यामध्ये लक्ष घालून स्टिंग ऑपरेशन करून सदरील आरटीओ ऑफिस कार्यालयाचेच फिटनेस तपासावे अशी देखील मागणी होत आहे.+

पान १ वरून

## सभापती इलियास

(एमआयएम) पक्षात प्रवेश केला. हा प्रवेश काल दिनांक ११ नोव्हेंबर रोजी बीड येथे मा. जिल्हाध्यक्ष ॲडव्होकेट शेख शफिक भाऊ यांच्या उपस्थितीत पार पडला.

बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब, आमदार अकबरोद्दीन औवेसी साहेब , प्रदेश अध्यक्ष तथा मा खा.इम्तियाज जलील यांच्या हात बळकट करण्यासाठी व प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर मा बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक यांच्यावर विश्वास ठेवून हा प्रवेश करण्यात आला.

इलियास भाया हे राष्ट्रवादी अजित पवार गटातील प्रमुख नेते असून, ते म्हणून अजीत दादा पवार यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश झाल्याने अजित पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. एमआयएमच्या प्रवेशाने बीडमधील मुस्लिम बहुल भागातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.एमआयएम नेत्यांनी या प्रवेशाचे स्वागत करताना म्हटले आहे, ये तो अभी ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है. यामुळे निवडणुकीपूर्वी आणखी काही मोठे राजकीय बदल होण्याची चर्चा रंगली आहे. या प्रवेश वेळी मा एम आय एम बीड तालुका अध्यक्ष तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष खन्ना भैय्या, नगरसेवक तथा युवक जिल्हाध्यक्ष शेख मतीन,जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली (लालु) मा. बांधकाम अध्यक्ष सय्यद बासेद आदी मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी सर्व पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली असून, हा प्रवेश निवडणुकीच्या निकालावर कसा परिणाम करेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मनोज जरांगेंच्या

यांच्याशी कांचन साळवी नावाच्या व्यक्तीचा सबंध असल्याचा आणि तो धनंजय मुंडे यांचा झ- असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला होता. दरम्यान साळवी याला अटक केल्यानं आता या प्रकरणात साळवी पोलिसांकडे काय खुलासे करतो? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

धनंजय मुंडेंवर आरोप करताना जरांगे म्हणाले की, बीडचा कांचन नावाचा माणूस आहे. तो धनंजय मुंडेंचा कार्यकर्ता किंवा पीए आहे. धनंजय मुंडे यांनी माझ्याविरोधात षडयंत्र रचण्याचं काम केलं आहे. कांचन नावाच्या माणासाने दोन्ही आरोपींना हाताशी धरलं. या आरोपींना मला मारायचं सांगितलं असेल, ते तपासातून समोर येईल. मात्र कांचनने या पोरांना परळीला नेलं. तेव्हा रेस्ट हाऊसमध्ये एक मोठी बैठक सुरू होती, हा आलेला समजलं की धनंजय मुंडेंनी बैठक सोडली आणि २० मिनिटात इकडे आले. तिथे एक आरोपी नेला होता. तिथे दुसरा आधीपासून होता.

इकडे आल्यानंतर त्यांचा दोन कोटींमध्ये सौदा झाला. त्यात ५० लाख अधिक देण्याचं ठरलं. याआधीही त्यांनी यासाठी पाच ते सहा कोटी रुपये नासवले आहेत. इथून घातपाताचा प्लॅन सुरू झाला. धनंजय मुंडे प्रत्यक्षात या दोन आरोपींना भेटला आहे. त्यांनीच हे करायला सांगितलं आहे. हेही आरोपींना माहीत आहे. याचा सखोल तपास होणं गरजेचं आहे, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## उद्धव ठाकरे-शरद

याप्रकरणी सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली.

आगामी स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वांचेच लक्ष या निकालाकडे लागले होते. पक्ष आणि चिन्हाचा निर्णय होणे अपेक्षित असताना कोर्टाने आता २१ जानेवारी नवीन तारीख दिली आहे. त्यामुळे आज देखील या खटल्याचा निकाल लागला नसून पुन्हा एकदा नवीन तारीख दिली आहे. २६ नोव्हेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यामुळे आजच्या निर्णयामुळे पुन्हा एकदा ठाकरे गट निराश झाला आहे.राज्यात येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होत आहेत. या निवडणुकीपूर्वी सुप्रीम कोर्टात सुनावणी होऊन शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्ष व चिन्ह यावर १२ नोव्हेंबरला सुनावणी होऊन निर्णय लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सुप्रीम कोर्टाने धक्का दिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत धनुष्यबाण अन् घड्याळ वापरण्याचे त्यांचे इरादे धुळीस मिळाले आहेत.